RNI No. MAHBIL /2009/35827

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष १२, अंक १३] गुरुवार ते बुधवार, मार्च २६-एप्रिल १, २०२६/चैत्र ५-११, शके १९४८ [पृष्ठे २४, किंमत : रुपये १५.००

### प्राधिकृत प्रकाशन

### संकीर्ण सूचना व जाहिराती

**जिल्हा परिषद बीड**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ६६ (अ) (८) व (९) अन्वये मी, जितीन रहमान मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड सन २०२३-२०२४ चे वार्षिक लेखे नमुना नं. २१ (ई) मध्ये प्रसिद्ध करीत आहे.

क्र. विवी/संकलन/कावि- २०२५/२५२

| जमा शीर्ष | | | खर्च शीर्ष | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. (१) | जमा शीर्ष (२) | रक्कम (३) | अ. क्र. (४) | खर्चाचे शीर्ष (५) | रक्कम (६) |
| १ | आरंभिची शिल्लक | ९६७९३३४७८१.५० | १ | महसुली खर्च | १७९९६९४४२९५.९८ |
| २ | महसुली जमा | १८३२७४२९५९५.०० | २ | भांडवली खर्च | ११७२६२५०१५.०० |
| ३ | भांडवली जमा | १०७०५०६७००.०० | ३ | वित्त प्रेषण | १२८४६५९६१८४.०० |
| ४ | वित्त प्रेषण | १२८७४९४३६७१.०० | ४ | महसूल + भांडवल + वित्तप्रेषण | ३२०१६१६५४९४.९८ |
| ५ | महसूल + भांडवल + वित्तप्रेषण | ३२२७२८७९९६६.०० | ५ | अखेरची शिल्लक | ९९३६०४९२५२.५२ |
| | **एकूण :-** | **४१९५२२१४७४७.५०** | | | **४१९५२२१४७४७.५०** |

बीड,
दिनांक ११ मार्च २०२६.

**जितीन रहमान,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद बीड.

## जिल्हा परिषद, यवतमाळ

## अधिसूचना

क्रमांक यजिप/साप्रवि/ वि. अ.(सां)/०६/२०२६.—यवतमाळ जिल्हा परिषदेचा व तिच्या कार्यक्षेत्रातील पंचायत समित्यांचा (एकत्रीत) सन २०२४-२५ चा वार्षिक प्रशासन अहवाल, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १४२ चे आधारे (वार्षिक प्रशासन अहवाल तयार करणे) व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणेनुसार तयार करण्यात आला असून सदर अहवाल जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची दिनांक १३.०२.२०२६ रोजी ठराव क्रमांक १३ अन्वये मंजुरी घेऊन तो दिनांक १३.०२.२०२६ रोजी जिल्हा परिषदेच्या कार्यालयात प्रसिध्द करण्यात आला आहे.

यवतमाळ,
दिनांक : १३ फेब्रुवारी २०२६.

(सही-)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, यवतमाळ.

## म्हसळा नगरपंचायत, म्हसळा

### सूचना

**म्हसळा नगरपंचायत शहराच्या प्रारूप विकास योजनेमधील फेरबदल/बदलांच्या सूचीचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (४) अन्वये प्रसिद्धिकरण**

क्रमांक म्हनप/जाहीर सूचना/२०२६/४०६.—ज्याअर्थी, म्हसळा नगरपंचायतीने, नियोजन प्राधिकरण म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) नुसार प्रारूप विकास योजना, दि. २७/०२/२०२५ चे सूचनेव्दारे नागरिकांच्या सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध केली आहे. सदरची सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग - २ मध्ये दि. २७/०२/२०२५ रोजी प्रसिद्ध झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त योजनेवर विहित मुदतीत प्राप्त सूचना व हरकतीचा विचार करून उक्त अधिनियमाच्या कलम २८ (४) नुसार स्थापन झालेल्या नियोजन समितीने तिचा अहवाल उक्त नियोजन प्राधिकरणाकडे दि. २५/०९/२०२५ रोजी सादर केला;

आणि ज्याअर्थी, नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालावर विचारांती उक्त नियोजन प्राधिकरणाने, तो नव्याने बदल सुचवून, उक्त योजनेत फेरबदल/बदल करण्यासाठी व ती उक्त अधिनियमाच्या कलम ३० नुसार शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यासाठी ठराव क्र. २३, दि. ३०/०९/२०२५ पारित केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २८ (४) खालील तरतुदीनुसार उक्त योजनेच्या मसुद्यात केलेले फेरबदल/ बदल नागरिकांच्या अवलोकनार्थ प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, उक्त प्रारूप विकास योजनेच्या मसुद्यात नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २८ (४) नुसार केलेल्या फेरबदलांची बदलांची सूची परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे, नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर फेरबदल बदल दर्शविणारा उक्त प्रारूप विकास योजनेचा नकाशा खालील नमूद केलेल्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत ३० दिवसांच्या कालावधीकरिता नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला आहे.

(१) मुख्याधिकारी म्हसळा नगरपंचायत ता. म्हसळा, जि. रायगड.

(२) सहायक संचालक, नगररचना रायगड शाखा, अलिबाग.

### परिशिष्ट अ

### अधिनियमाचे कलम २८ (४) नुसार केलेल्या फेरबदल/बदलांची सूची

| फेरबदल क्रमांक | फेरबदल |
|---|---|
| एम- १ | १) मौजे म्हसळा येथील स.नं. २० ( पैकी) चे नकाशात दर्शविल्याप्रमाणे शेती विभागातील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.<br>२) मौजे म्हसळा येथील स.नं. ३४ (पैकी) चे नकाशात दर्शविल्याप्रमाणे शेती विभागातील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.<br>३) मौजे म्हसळा येथील स.नं. ४६ (पैकी) चे नकाशात दर्शविल्याप्रमाणे शेती विभागातील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे. |
| एम-२ | १) मौजे म्हसळा येथील स.नं. ४०, ४१ चे शेती विभागातील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे. |
| एम-३ | १) मौजे म्हसळा स.नं. १८ (पैकी) मधील प्रस्तावित आरक्षण क्र. १३ बस डेपो व शेती विभाग रद्द करून सदरची जागा रहिवास विभागामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे. |
| एम-४ | १) मौजे म्हसळा स.नं. ८५ (पैकी) मधील नकाशात दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित १२.० मी. उत्तर दक्षिण रस्ता रद्द करून सदरची जागा रहिवास विभागामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे.<br>२) मौजे म्हसळा स.नं. ८० (पैकी) मधील नकाशात दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित १२.० मी. उत्तर दक्षिण रस्ता रद्द करून सदरची जागा रहिवास विभागामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे.<br>३) मौजे म्हसळा येथील स.नं. ८० (पैकी) चे नकाशात दर्शविल्याप्रमाणे शेती विभागातील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे. |

| फेरबदल क्रमांक | फेरबदल |
|---|---|
| एम-५ | मौजे म्हसळा स.नं. ७४ (पैकी) मधील नकाशात दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित ९० मी. रस्ता रुंदीकरण रद्द करून सदरची जागा रहिवास विभागामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे. |
| एम- ६ | १) मौजे म्हसळा येथील स.नं. ७६ (पैकी) मधील नकाशात दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित ९.० मी. उत्तर - दक्षिण रस्ता रद्द करून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.<br>२) मौजे म्हसळा येथील स.नं. ७२ (पैकी) मधील नकाशात दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित ९.० मी. उत्तर - दक्षिण रस्ता रद्द करून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.<br>३) मौजे म्हसळा येथील स.नं. ७६ (पैकी) मधील नकाशात दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित ९.० मी. पूर्व पश्चिम रस्ता रद्द करून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे. |
| एम-७ | १) मौजे म्हसळा येथील स.नं. ६७ (पैकी) व २ (पैकी) मधील नकाशात दर्शविल्याप्रमाणे मशिदीची जागा सार्वजनिक निमसार्वजनिक वापर विभागातून वगळून रहिवास विभागामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे.<br>२) मौजे म्हसळा स.नं. ८९ (पैकी) मधील प्रस्तावित आरक्षण क्र.२ म्युनिसिपल परपज रद्द करून सदरची जागा नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे दफन भूमी असे दर्शविण्यात येत आहे. |
| एम-८ | मौजे म्हसळा येथील स.नं. ६०/२/अ चे शेती विभागातील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे |
| एम- ९ | मौजे म्हसळा येथील आरक्षण क्र. ४ (खेळाचे मैदान) पासून प्रस्तावित १२.० मी. पूर्व पश्चिम रस्ता विद्यमान दिघी पोर्ट रोड पर्यंत (नकाशात दर्शविल्याप्रमाणे) रद्द करून सदरची जागा रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे. |
| एम- १० | मौजे म्हसळा स.नं. ९६ (पैकी) मधील प्रस्तावित आरक्षण क्र.४ खेळाचे मैदान रद्द करून सदरची जागा रहिवास विभागामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे. |
| एम-११ | मौजे सावर येथील स.नं. ३३/अ/७/अ/ (पैकी) मधील नकाशात दर्शविल्याप्रमाणे शैक्षणिक वापर विभागातून (कॉलेज) वगळून रहिवास विभागामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे. |
| एम-१२ | मौजे म्हसळा येथील स.नं. १७ (पैकी), १८ (पैकी) मध्ये नकाशात दर्शविल्याप्रमाणे नवीन आरक्षण क्र. १८ म्हसळा नगरपंचायत प्रशासकीय कार्यालय इमारत क्षेत्र ४३.४० गुंठे (४३४० चौ.मी.) प्रस्तावित करण्यात येत आहे. |
| एम- १३ | मौजे म्हसळा येथील स.नं. २९ मध्ये नकाशात दर्शविल्याप्रमाणे नवीन आरक्षण क्र. १९ अग्निशमन केंद्र क्षेत्र १०.० गुंठे (१००० चौ. मी.) प्रस्तावित करण्यात येत आहे. |
| एम-१४ | मौजे सावर येथील स.नं. ४३ मध्ये नकाशात दर्शविल्याप्रमाणे अस्तित्वातील करजाई देवी मंदिर (देवस्थान) दाखविण्यात आलेले आहे. |
| एम-१५ | मौजे म्हसळा येथील स.नं. ६४/१ मध्ये नकाशात दर्शविल्याप्रमाणे नवीन आरक्षण क्र. २० बगिचा क्षेत्र २६ गुंठे (२६०० चौ.मी.) प्रस्तावित करण्यात येत आहे. |
| एम- १६ | विकास योजनेवरती खालीलप्रमाणे टीप नमूद केलेली आहे.<br>विकास परवानगीच्या वेळी सर्व अंतर्गत रस्ते ९.० मी. रुंदीचे करणे बंधनकारक राहील. |
| एम-१७ | मौजे म्हसळा येथील स.नं ३८/१ मध्ये नकाशात दर्शविल्याप्रमाणे नवीन आरक्षण क्र. २१ डंपिंग ग्राऊंडसाठी क्षेत्र ६१ गुंठे (६१०० चौ. मी.) प्रस्तावित करण्यात येत आहे. |
| एम-१८ | मौजे म्हसळा येथील स.नं. ३७ मध्ये नकाशात दर्शविल्याप्रमाणे डंपिंग ग्राऊंडकडे जाणारा १२.० मी. रुंदीचा रस्ता नव्याने प्रस्तावित करण्यात येत आहे |

म्हसळा,
दिनांक १८ मार्च २०२६.

**विठ्ठल राठोड,**
मुख्याधिकारी,
नगरपंचायत म्हसळा, म्हसळा.

## MHASALA NAGAR PANCHAYAT, MHASALA

### Notice

**Publication of list of Modifications/Changes in Draft Development Plan of u/s 28(4) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

No. म्हनप/जाहीर सूचना/२०२६/४०६.—Whereas Mhasala Nagar Panchayat, being Planning Authority, has published the Draft Development Plan Mhasala u/s 26(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 *vide* notice dated 27/02/2025 for inviting suggestions/objections from public. The said notice is published in *Maharashtra Government Gazzette* of extraordinary Part-2, dated 27/12/2025;

And whereas, after considering the suggestions/objections to the said Plan received within stipulated period, the Planning Committee constituted u/s 28(4) of the said Act, has submitted its report to the said Planning Authority on 25/09/2025;

And whereas, the said Planning Authority after considering the report submitted by Planning Committee, accepted it with changes and passed resolution No. 23 dated 30/09/2025 to make modifications/changes to the said plan and to submit the said plan for sanction to the Government u/s 30 of the said Act ;

And whereas, it is necessary to publish the said modification/changes made in the said Plan for inspection of the public as per section 28(4) of the said Act.

Now, therefore, the list of modifications/changes made u/s 28(4) of the act by the said Planning Authority is hereby published as Appendix-A as per the provisions of said Act for information of the public. The said Draft Development plan showing the modifications/changes is kept open for the inspection of the public in the following offices, on working days, during office hours for a period of 30 days.

1. The Chief officer, Mhasala Nagar panchayat, Mhasala.
2. Assistant Director, Town Planning, Raigad Branch Alibag.

**"Appendix A"**

**List of modifications/changes made u/s 28(4) of the Said Act**

| Modification | Description |
|---|---|
| M-1 | 1. Zone of St.no.20(p), of Mauje Mhasala is deleted from Agricultural Zone and included in Residential Zone as Shown on plan.<br>2. Zone of Sr. No 34(p), of Mauje Mhasala is deleted from Agricultural Zone and included in Residential Zone as shown on plan<br>3. Zone of Sr. No, 46(p), of Mauje Sawar in deleted from Agricultural Zone and included in Residential Zone as shown on plan |
| M-2 | Zone of Sr. No 40, 41 of Mauje Mhasala deleted From Agricultural Zone and included in Residential Zone |
| M-3 | Land of Sr. No. 18(p), of Mhasala village affected by Reservation No.13 (Bus Depot) and Agriculture Zone is deleted from Concerned zone and included in Residential Zone as shows on Plan |
| M-4 | 1. Proposed 12.0 m. North-South Road in Sr.No, 85(p) of Mauje Mhasala is deleted and land released to be included in Residential Zone as shown on plan<br>2. Proposed 12.0 m North-South road in Sr. No.80(p) of Mauje Mhasala is deleted and land Released to be included in Residential Zone as shown on plan<br>3. Zone of Sr. No 80(p) of Mauje Mhasla deleted from Agricultural Zone and included in Residential Zone as shown on plan |
| M-5 | Proposed 9.0 m. road widening in Sr.No.74(p) of Mauje Mhasala is deleted and land released to be included in Residential Zone shown on plan |

| Modification | Description |
|---|---|
| M-6 | 1. Proposed 9.0 m. North-South road in Sr.No. 76(p) Mauje Mhasala is deleted and land released to be included in Residential Zone as shown on plan.<br>2. Proposed 9.0 m. North-South road in Sr.No. 72 (p) of Mauje Mhasala is deleted and land released to be included in Residential Zone as shown on plan.<br>3. Proposed 9.0 m. East-West road in Sr.No. 76(p) of Mauje Mhasala is deleted and land released to be included in Residential Zone as shown on plan. |
| M-7 | 1. Land of Sr. No. 67(p) & 2(p) of Mhasala Village affected by Mosque(M) is deleted and land released to be included in Residential Zone as shown on plan.<br>2. Land of Sr.No.89 pt of Mhasala village affected by reservation no.2 (Municipal purpose) is deleted shown as Burial Ground as shown on plan. |
| M-8 | Zone of Sr. No.60/2/A of Mauje Mhasala is deleted from Agricultural Zone and included in Residential Zone |
| M-9 | Proposed 12.0 m. wide East-West road starting 4 (Play Ground) up to existing Dighi port road is deleted and land released to be included in Residential Zone as shown on plan. |
| M-10 | Land of Sr. No. 96(p) of Mhasala village affected by reservation No.4 (Play Ground) is deleted and included in Residential Zone. |
| M-11 | Zone of Sr. No. 33(p) of Mauje Sawar is deleted from Educational Zone (College) and included in Residential Zone as shown on plan |
| M-12 | At Mauje Mhasala, Sr. No. 17(p), 18(p), New Reservation No. 18 proposed for Mhasala Nagar Panchayat administrative office building and measuring 43.40 guntha (4340 sq.m.) as shown on plan. |
| M-13 | At Mauje Mhasala, Sr. No.29, New Reservation No. 19 proposed for Fire station admeasuring 10.0 guntha (1000 sq.m.) as shown on plan. |
| M-14 | At Mauje Sawar, Sr. No.43, the existing Karjai Devi Temple (Devastan) is shown on the Development Plan. |
| M-15 | At Mauje Mhasala, Sr. No.64/1, New Reservation No. 20 Proposed for Garden admeasuring 26 guntha (2600 sq.m.) as shown on plan. |
| M-16 | A note on DP Plan is added as below All internal road shall be widened upto 9 m. width at the time of development Permission. |
| M-17 | At Mauje Mhasala, Sr. No.38/1, New Reservation No. 21 proposed for dumping ground admeasuring 61 guntha (6100 sq.m.) as shown on plan. |
| M-18 | At Mauje Mhasala, Sr. No.37, a road 12.0 m. in width leading towards the dumping ground is Proposed as shown on Plan. |

Mhasala,
dated 18th March, 2026.

VITTHAL RATHOD,
The Chief Officer,
Mhasala Nagar Panchayat,
Mhasala.

# महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई (सेवाप्रवेश) नियम, २०२५.

## परिशिष्ट : १

| | | |
|---|---|---|
| | क्रमांक –सेप्रनि-२०२३/प्र.क्र.८२/उद्योग-६— मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम, १९६० च्या कलम ७ मधील उप-कलम (६) व (७) आणि नियम ३० च्या उप-कलम (१) (२) (क) नुसार प्रदान करण्यांत आलेल्या अधिकाराचा वापर करून आणि राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने आणि उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या शासन निर्णय क्र. केव्हीबी-१०९७/(६६५४)/उद्योग-६ दि.०६/०१/१९९९ अन्वये अस्तित्वात असलेले महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सर्व सेवाप्रवेश नियम तसेच त्या संदर्भात यापूर्वी करण्यांत आलेले ठराव व आदेश अधिक्रमित करून, मंडळाच्या अखत्यारीतील "**गट-अ मधील** सह मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, लेखा व लेखा परीक्षण अधिकारी, प्रसिध्दी अधिकारी; **गट-ब मधील** सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, संचालक (मध उद्योग), संचालक (हातकागद); तसेच **गट-क मधील** ज्येष्ठ लघुलेखक, ज्येष्ठ अधीक्षक, प्रसिध्दी सहायक, लेखापाल तथा लेखा परीक्षक, ज्येष्ठ सहायक /रोखपाल, ज्येष्ठ पर्यवेक्षक, निरीक्षक (मधमाशापालन), कनिष्ठ सहायक तथा टंकलेखक, प्रयोगशाळा सहायक (मध), पर्यवेक्षक उद्योग, मधुक्षेत्रिक" या पदांच्या सेवा प्रवेशाचे नियमांचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत. | |
| १. | **संक्षिप्त नाव, प्रारंभ** | |
| | (१) | या नियमांना महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ कार्यालयातील "गट-अ मधील सह मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, लेखा व लेखा परीक्षण अधिकारी, प्रसिध्दी अधिकारी; गट-ब मधील सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, संचालक (मध उद्योग), संचालक (हातकागद); तसेच गट-क मधील ज्येष्ठ लघुलेखक, ज्येष्ठ अधीक्षक, प्रसिध्दी सहायक, लेखापाल तथा लेखा परीक्षक, ज्येष्ठ सहायक / रोखपाल, ज्येष्ठ पर्यवेक्षक, निरीक्षक (मधमाशापालन), कनिष्ठ सहायक तथा टंकलेखक, प्रयोगशाळा सहायक (मध), पर्यवेक्षक उद्योग, मधुक्षेत्रिक" सेवाप्रवेश नियम २०२५ असे संबोधण्यात येईल. |
| | (२) | सदर नियम **शासन राजपत्र** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील. |
| २. | **व्याख्या :-** या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर -- | |
| | (१) | "**शासन**" याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे. |
| | (२) | "**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**" याचा अर्थ भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६६ अन्वये बनविलेल्या महाराष्ट्र शासन कार्य नियमावलीच्या पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेला उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग असा आहे. |
| | (३) | "**मंडळ**" यांचा अर्थ उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग महाराष्ट्र शासन या विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ असा आहे. |
| | (४) | "**आयोग**" याचा अर्थ महाराष्ट्र लोकसेवा आयोग असा आहे. |
| | (५) | "**निवड समिती**" याचा अर्थ, मंडळाच्या सेवेतील पदांच्या सरळसेवा भरतीकरिता उमेदवारांच्या निवडीच्या प्रयोजनार्थ शासनाकडून वेळोवेळी गठित करण्यात आलेली समिती असा आहे. |

| | | |
|---|---|---|
| | (६) | "**पदवी**" यांचा अर्थ सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्यांच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली पदवी, असा आहे.<br>"**शैक्षणिक अर्हता**" याचा अर्थ असा आहे.<br>उदा. "**पदवी**" यांचा अर्थ सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्यांच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेले अन्य कोणतीही अर्हता.<br>(शासनाचे ज्या पदाचे सेवाप्रवेश नियम नमूद करण्यात आले आहेत, त्या पदासाठी नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार संबंधित शैक्षणिक अर्हतेची व्याख्या राहील) |
| | (७) | "**पदव्युत्तर पदवी**" यांचा अर्थ सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदव्युत्तर पदवी किंवा शासनाने त्यांच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली पदवी, असा आहे. |
| | (८) | "**तांत्रिक अर्हता**" याचा अर्थ ज्या पदाच्या सेवाप्रवेश नियमात नमूद करण्यात आलेली विशिष्ट तांत्रिक अर्हता, असा आहे. |
| | (९) | "**पदोन्नतीसाठी पात्रता**" याचा अर्थ सामान्य प्रशासन विभागाने पदोन्नतीच्या पात्रतेबाबत वेळोवेळी नियम, परिपत्रक किंवा आदेश या नुसार विहित केलेल्या अटी व शर्ती या नुसारची पदोन्नतीसाठीची पात्रता |
| | (१०) | "**ज्येष्ठता अधिन पात्रता**" याचा अर्थ सेवा ज्येष्ठता यादीनुसार ज्येष्ठता व सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ०१/०८/२०१९ च्या आदेशाद्वारे व त्यानंतर वेळोवेळी यासंदर्भात निर्गमित केलेल्या नियम, परिपत्रक किंवा आदेशाद्वारे पदोन्नतीसाठी विहित केलेल्या अटी व शर्ती नुसार पात्रता असा आहे. |
| | (११) | "**सक्षम प्राधिकारी**" म्हणजे खादी व ग्रामोद्योग मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| | (१२) | "**नियुक्ती प्राधिकारी**" म्हणजे खादी व ग्रामोद्योग मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| | (१३) | "**मंडळाचे सेवाचे गट**" :- अधिकारी गट-अ व गट-ब<br>कर्मचारी गट-क व गट-ड |
| ३. | **नियुक्तीचा मार्ग :—**मंडळातील "गट-अ मधील सह मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, लेखा व लेखा परीक्षण अधिकारी, प्रसिध्दी अधिकारी ; गट-ब मधील सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, संचालक (मध उद्योग), संचालक (हातकागद) ; तसेच गट-क मधील ज्येष्ठ लघुलेखक, ज्येष्ठ अधीक्षक, प्रसिध्दी सहायक, लेखापाल तथा लेखा परीक्षक, ज्येष्ठ सहायक /रोखपाल, ज्येष्ठ पर्यवेक्षक, निरीक्षक (मधमाशापालन), कनिष्ठ सहायक तथा टंकलेखक, प्रयोगशाळा सहायक (मध), पर्यवेक्षक उद्योग, मधुक्षेत्रिक" या पदावरील नियुक्त पुढील मार्गाने करण्यात येईल. | |

| | | |
|---|---|---|
| | १. | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयात "सह मुख्य कार्यकारी अधिकारी (गट-अ)" या पदावरील नियुक्ती :-<br>क) मंडळातील पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी (गट-अ) या संवर्गातील, त्या पदावरील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित आणि अखंड सेवा असणाऱ्या आणि मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी धारण करणा-या पात्र व्यक्तींमधून सेवा जेष्ठतेच्या आधारे योग्य कर्मचाऱ्याची **पदोन्नतीने** करण्यात येईल. किंवा<br>ख) जर मंडळात पदोन्नतीसाठी पात्र उमेदवार उपलब्ध झाला नाही तर असा उमेदवार उपलब्ध होईपर्यंत समकक्ष वेतनश्रेणीतील प्रशासकीय कामकाजाचा अनुभव असलेल्या योग्य अधिकाऱ्याच्या **प्रतिनियुक्तीने** करण्यात येईल. प्रतिनियुक्तीद्वारे नियुक्ती ही, सामान्य प्रशासन विभागाच्या प्रतिनियुक्तीच्या धोरणाच्या सर्व अटी व शर्तीनुसार शासनामार्फत करण्यात येईल. |
| | २. | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयात "उप मुख्य कार्यकारी अधिकारी (गट-अ)" या पदावरील नियुक्ती :—<br>मंडळातील पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या गट-ब मधील सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी / जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी / संचालक (मध उद्योग) / संचालक (हातकागद) या संवर्गातील, त्या पदावरील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित आणि अखंड सेवा असणाऱ्या आणि मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी धारण करणाऱ्या पात्र कर्मचाऱ्यांमधून सेवा जेष्ठतेच्या* आधारे योग्य कर्मचाऱ्याची **पदोन्नतीने** करण्यात येईल. (*सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी / जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी / संचालक (मध उद्योग) / संचालक (हातकागद) या संवर्गांची जेष्ठतासूची एकच असावी. या पदावरील नियमित नियुक्तीच्या दिनांकाची जेष्ठता गृहीत धरण्यात येईल) |
| | ३. | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयात "लेखा व लेखापरीक्षण अधिकारी (गट-अ)" या पदावरील नियुक्ती :—<br>महालेखाकार/अधिदान व लेखा कार्यालय/कोषागार संचालनालय या कार्यालयातील समकक्ष अधिकाऱ्यांमधून **प्रतिनियुक्तीने** करण्यांत येईल. |
| | ४ | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयात "प्रसिध्दी अधिकारी (गट-अ)" या पदावरील नियुक्ती :-<br>(क) जे उमेदवार पुढील निकषांची पूर्तता करतात अशा, त्यासाठी शासनाने नेमलेल्या निवड समितीद्वारे निश्चित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार आयोजित स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांमधून **नामनिर्देशनाद्वारे** करण्यात येईल :<br>(एक) वयोमर्यादा -<br>(क) किमान वयोमर्यादा - त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास २१ वर्षे वय पूर्ण. |

<table>
<tr><td></td><td></td><td>(ख) कमाल वयोमर्यादा - त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी ३८ वर्षे वय पूर्ण केलेले आणि राखीव प्रवर्गातील असलेल्या व्यक्तींसाठी ४३ वर्षे वय पूर्ण.<br><br>(दोन) किमान शैक्षणिक अर्हता - कोणत्याही सांविधिक विद्यापीठामधून कोणत्याही विद्या शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि वृत्तपत्र विद्या या विषयातील पदविका परीक्षा उत्तीर्ण.<br><br>अथवा<br><br>संज्ञापन व वृत्तपत्र विद्या या विषयातील पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br><br>(तीन) वृत्तपत्र व्यवसायातील किंवा अन्यत्र जाहिरात २ प्रसिद्धीशी संबंधीत कार्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. किमान शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतर प्राप्त केलेला अनुभव हा जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकापर्यंतचा प्रत्यक्ष असलेला अनुभव असावा.<br><br>अथवा<br><br>(ख) शासन सेवेतील गट-ब च्या पदावर किमान तीन वर्षाचा अनुभव असणाऱ्या आणि कोणत्याही सांविधिक विद्यापीठामधून कोणत्याही विद्या शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि वृत्तपत्र विद्या या विषयातील पदविका परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या व्यक्तींमधून प्रतिनियुक्तीने करण्यात येईल.</td></tr>
<tr><td></td><td>५.</td><td>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयात <u>“सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, संचालक (मध उद्योग), संचालक (हातकागद) (गट-ब)”</u> या पदांवरील नियुक्ती :-<br><br>सदर पदे पदोन्नतीने : नामनिर्देशन याद्वारे २५%:७५% या प्रमाणात खालीलप्रमाणे भरण्यात येतील.<br><br>(क) सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, संचालक (मध उद्योग), संचालक (हातकागद) या संवर्गाच्या एकूण मंजूर पदांपैकी २५% पदे मंडळाच्या जेष्ठ अधीक्षक (गट-क) या संवर्गातील त्या पदावरील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित आणि अखंड सेवा असणाऱ्या आणि मंडळाची विभागीय परीक्षा उत्तीर्ण असलेल्या आणि कोणत्याही सांविधिक विद्यापीठामधून कोणत्याही विद्या शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण किंवा तिला समतुल्य असल्याचे घोषित केलेली अन्य कोणतीही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पात्र व्यक्तींमधून सेवा जेष्ठतेच्या आधारे आवश्यकतेनुसार विकल्प प्राप्त करून घेऊन योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल.<br><br>(ख) सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, संचालक (मध उद्योग), संचालक (हातकागद) या संवर्गाच्या एकूण मंजूर पदांपैकी ७५% पदे जे उमेदवार पुढील निकषांची पूर्तता करतात अशा, त्यासाठी शासनाने नेमलेल्या निवड समितीद्वारे निश्चित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार आयोजित स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | (एक) वयोमर्यादा –<br>(क) किमान वयोमर्यादा – त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास २१ वर्षे वय पूर्ण.<br>(ख) कमाल वयोमर्यादा – त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी ३८ वर्षे वय पूर्ण केलेले आणि राखीव प्रवर्गातील असलेल्या व्यक्तींसाठी ४३ वर्षे वय पूर्ण.<br>(दोन) किमान शैक्षणिक अर्हता – कोणत्याही सांविधिक विद्यापीठामधून कोणत्याही विद्या शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण किंवा तिला समतुल्य असल्याचे घोषित केलेली अन्य कोणतीही शैक्षणिक अर्हता.<br>सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, संचालक (मध उद्योग), संचालक (हातकागद) गट-ब या पदांवरील नामनिर्देशनाने नियुक्त केलेली व्यक्ती, दोन वर्षांच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन असेल. परिवीक्षा कालावधी सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार कमाल एक वर्षापर्यंत वाढवता येईल. सदर पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने परिविक्षा कालावधी (वाढीव कालावधीसह) शासनाच्या परिविक्षा धोरणानुसार समाधानकारकरित्या पूर्ण करणे, कोणतीही असल्यास, विहित केलेली सेवा प्रवेशोत्तर/विभागीय परीक्षा उत्तीर्ण करणे आणि असल्यास, कोणतेही विहित केलेले प्रशिक्षण पूर्ण करणे अनिवार्य असेल. जर तिने शासनाच्या परिवीक्षा धोरणानुसार (वाढीव कालावधीसह) परिवीक्षा कालावधी समाधानकारकरित्या किंवा परिवीक्षा कालावधीतील कोणतीही असल्यास, विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण केली नसेल किंवा कोणतेही असल्यास, विहित केलेले प्रशिक्षण पूर्ण केले नसेल तर, ती तिची सेवा समाप्त केली जाण्यास पात्र असेल.<br>**टीप** :- मागील सेवा भरतीनियमामध्ये यापूर्वी संचालक (मध उद्योग) गट-ब या १ मंजूर पदावर सहा. विकास अधिकारी (मध) गट-क / रसायन शास्त्रज्ञ गट-क / संशोधन अधिकारी गट-क या पदांमधून भरली जात होती, परंतु उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागच्या दि.०६ मार्च २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या नवीन आकृतिबंधात ही पदे निरसित करण्यांत आल्यामुळे सहा. विकास अधिकारी (मध) गट-क / रसायन शास्त्रज्ञ गट-क / संशोधन अधिकारी गट-क ही पदे कार्यरत असे पर्यत सद्याच्या मंजूर संचालक (मध उद्योग) पदोन्नतीची पदे सहा. विकास अधिकारी (मध) गट-क / रसायन शास्त्रज्ञ गट-क / संशोधन अधिकारी गट-क या पदांमधून सेवा जेष्ठतेच्या आधारे पदोन्नतीने भरण्यांत येतील. |
| | ६. | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयात "ज्येष्ठ लघुलेखक (गट-क)" या पदांवरील नियुक्ती :—<br>जे उमेदवार पुढील निकषांची पूर्तता करतात अशा आणि त्यासाठी शासनाने नेमलेल्या निवड समितीद्वारे निश्चित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार आयोजित स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांमधून **नामनिर्देशनाद्वारे** करण्यात येईल : |

| | | |
|---|---|---|
| | | (एक) वयोमर्यादा –<br>(क) किमान वयोमर्यादा – त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास २१ वर्षे वय पूर्ण.<br>(ख) कमाल वयोमर्यादा – त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी ३८ वर्षे वय पूर्ण केलेले आणि राखीव प्रवर्गातील असलेल्या व्यक्तींसाठी ४३ वर्षे वय पूर्ण.<br>(दोन) किमान शैक्षणिक अर्हता – कोणत्याही सांविधिक विद्यापीठामधून कोणत्याही विद्या शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण किंवा तिला समतुल्य असल्याचे घोषित केलेली अन्य कोणतीही शैक्षणिक अर्हता तसेच मराठी टंकलेखनातील प्रति मिनिट ४० शब्दांपेक्षा कमी नसेल आणि इंग्रजी टंकलेखनातील प्रति मिनिट ५० शब्दांपेक्षा कमी नसेल इतक्या वेगमर्यादेचे, शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखन प्रमाणपत्र; आणि इंग्रजी किंवा मराठी प्रति मिनिट १२० शब्दांपेक्षा कमी नसेल इतक्या वेगमर्यादेचे, लघु-लेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करीत असतील, अशा व्यक्तींमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.<br>**टीप** .—मागील सेवा भरती नियमामध्ये यापूर्वी ज्येष्ठ लघुलेखक गट-क ही २ मंजूर पदे टंकलेखक लघुटंकलेखक→कनिष्ठ लघुलेखक→ज्येष्ठ लघुलेखक याप्रमाणे पदोन्नतीने भरली जात होती, परंतु उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागच्या दि.०६ मार्च २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या नवीन आकृतिबंधात टंकलेखक, लघुटंकलेखक व कनिष्ठ लघुलेखक ही पदे निरसित करण्यांत आली आहेत. टंकलेखक, लघुटंकलेखक व कनिष्ठ लघुलेखक या पदांपैकी टंकलेखक व लघुटंकलेखक या संवर्गातील **पदे कार्यरत असे पर्यंत** सध्याच्या मंजूर ज्येष्ठ लघुलेखकांची पदे मराठी टंकलेखनातील प्रति मिनिट ४० शब्दांपेक्षा कमी नसेल आणि इंग्रजी टंकलेखनातील प्रति मिनिट ५० शब्दांपेक्षा कमी नसेल इतक्या वेगमर्यादेचे, शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखन प्रमाणपत्र धारण करीत असलेल्या; आणि इंग्रजी किंवा मराठी प्रति मिनिट १२० शब्दांपेक्षा कमी नसेल इतक्या वेगमर्यादेचे, लघु-लेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करीत असलेल्या आणि पदावरील पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित आणि अखंड सेवा असणाऱ्या आणि मराठी टंकलेखनातील प्रति मिनिट ४० शब्दांपेक्षा कमी नसेल आणि इंग्रजी टंकलेखनातील प्रति मिनिट ५० शब्दांपेक्षा कमी नसेल इतक्या वेगमर्यादेचे, शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखन प्रमाणपत्र धारण करीत असलेल्या कार्यरत पदांमधून **पदोन्नतीने** भरण्यांत येतील. |
| | ७. | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयात “ज्येष्ठ अधीक्षक (गट-क)” या पदांवरील नियुक्ती :-<br>मंडळातील पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या लेखापाल तथा लेखा परीक्षक (गट-क) या संवर्गातील त्या पदावरील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित आणि अखंड सेवा असणाऱ्या आणि मंडळाची विभागीय परीक्षा उत्तीर्ण असलेल्या पात्र व्यक्तींमधून सेवा जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या **पदोन्नतीने** करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | **टीप** .— मागील सेवा भरती नियमामध्ये यापूर्वी ज्येष्ठ अधीक्षक (गट-क) ही मंजूर पदे सहायक जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी (गट-क) या पदांमधून पदोन्नतीने भरली जात होती, परंतु उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागच्या दि.०६ मार्च २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या नवीन आकृतिबंधात सहायक जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी (गट-क) ही पदे निरसित करण्यांत आली आहेत. सहायक जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी (गट-क) या संवर्गातील पदे कार्यरत असे पर्यंत सध्याच्या मंजूर ज्येष्ठ अधीक्षक (गट-क) या मंजूर पदांपैकी ४०% पदे ही कार्यरत असलेल्या सहायक जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी (गट-क) या पदावरील पाच वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित आणि अखंड सेवा असणाऱ्या पदांमधून पदोन्नतीने भरण्यांत येतील. |
| | ८. | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयात "प्रसिद्धी सहायक (गट-क)" वेतनश्रेणी या पदांवरील नियुक्ती :—<br><br>**१.** जे उमेदवार पुढील निकषांची पूर्तता करतात अशा, त्यासाठी शासनाने नेमलेल्या निवड समितीद्वारे निश्चित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार आयोजित स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांमधून **नामनिर्देशनाद्वारे** करण्यात येईल :<br><br>(एक) वयोमर्यादा –<br>(क) किमान वयोमर्यादा – त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास २१ वर्षे वय पूर्ण.<br>(ख) कमाल वयोमर्यादा – त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी ३८ वर्षे वय पूर्ण केलेले आणि राखीव प्रवर्गातील असलेल्या व्यक्तींसाठी ४३ वर्षे वय पूर्ण.<br><br>(दोन) किमान शैक्षणिक अर्हता – कोणत्याही सांविधिक विद्यापीठामधून कोणत्याही विद्या शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक, जाहिरात व प्रसिद्धी क्षेत्रातील पदविका असल्यास प्राधान्य तसेच पत्रकारिता व जनसंज्ञापन मधील पदविका वृत्तपत्र व्यवसायातील प्रसिद्धीच्या कामातील २ वर्षाचा अनुभव किमान शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतर प्राप्त केलेला अनुभव हा जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकापर्यंतचा प्रत्यक्ष असलेला अनुभव असावा.<br><br>अथवा<br><br>सरळसेवेने पद उपलब्ध होईपर्यंत शासनाच्या समकक्ष पदावर किमान पाच वर्षाचा अनुभव असणाऱ्या आणि कोणत्याही सांविधिक विद्यापीठामधून कोणत्याही विद्या शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण तसेच पत्रकारिता व जनसंज्ञापन मधील पदविका असणाऱ्या समकक्ष पदावरील व्यक्तींमधून **प्रतिनियुक्तीने** करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | ९. | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयात "लेखापाल तथा लेखा परीक्षक(गट-क)" वेतनश्रेणी या पदांवरील नियुक्ती :-<br><br>सदर पदे ज्येष्ठ सहायक / रोखपाल (गट-क), ज्येष्ठ पर्यवेक्षक (गट-क) आणि निरीक्षक (गट-क) या संवर्गांमधून पदोन्नतीने अनुक्रमे ५०%, ४०% आणि १०% या प्रमाणात खालीलप्रमाणे भरण्यात येतील.<br><br>(क) लेखापाल तथा लेखा परीक्षक या संवर्गातील मंजूर पदांपैकी ५०% पदे मंडळातील पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या ज्येष्ठ सहायक / रोखपाल (गट-क) या संवर्गातील, त्या पदावरील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित आणि अखंड सेवा असणाऱ्या आणि सदर पदोन्नतीच्या पदासाठी मंडळाची लेखा चाचणी विभागीय परीक्षा उत्तीर्ण /सवलत मिळालेल्या पात्र व्यक्तींमधून सेवा जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या **पदोन्नतीने** करण्यात येईल.<br><br>(ख) लेखापाल तथा लेखा परीक्षक या संवर्गातील मंजूर पदांपैकी ४०% पदे मंडळातील पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या ज्येष्ठ पर्यवेक्षक (गट-क) या संवर्गातील, त्या पदावरील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित आणि अखंड सेवा असणाऱ्या आणि सदर पदोन्नतीच्या पदासाठी मंडळाची लेखा चाचणी विभागीय परीक्षा उत्तीर्ण / सवलत मिळालेल्या पात्र व्यक्तींमधून सेवा जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या **पदोन्नतीने** करण्यात येईल.<br><br>**टिप** :- जुन्या आकृतिबंधानुसार सहायक जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी हे पद जेष्ठ परिवेक्षक या पदाला जेष्ठ होते. परंतु उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि.०६ मार्च २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या नवीन आकृतिबंधात सहायक जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी ही पदे निरसित करण्यात आली असून सहायक जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी ही पदे कार्यरत असे पर्यंत सध्याच्या मंजूर लेखापाल तथा लेखा परीक्षक या संवर्गातील मंजूर पदांपैकी ४०% पदे सहायक जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी या पदांमधून पात्रतेनुसार पदोन्नतीने भरण्यांत येतील त्यानंतर सदर पदे ज्येष्ठ पर्यवेक्षक या संवर्गातील पदांमधून पदोन्नतीने भरण्यांत येतील.<br><br>(ग) लेखापाल तथा लेखा परीक्षक या संवर्गातील मंजूर पदांपैकी १०% पदे मंडळातील पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या निरीक्षक (गट-क) या संवर्गातील, त्या पदावरील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित आणि अखंड सेवा असणाऱ्या आणि सदर पदोन्नतीच्या पदासाठी मंडळाची लेखा चाचणी विभागीय परीक्षा उत्तीर्ण / सवलत मिळालेल्या पात्र व्यक्तींमधून सेवा जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या **पदोन्नतीने** करण्यात येईल. |
| | १०. | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयात "ज्येष्ठ सहायक / रोखपाल(गट-क)" या पदांवरील नियुक्ती :-<br><br>(क) ज्येष्ठ सहायक / रोखपाल या संवर्गातील मंजूर पदांपैकी ५०% पदे मंडळातील पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या कनिष्ठ सहायक तथा टंकलेखक (गट-क) या संवर्गातील, त्या पदावरील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित आणि अखंड सेवा असणाऱ्या आणि सदर पदोन्नतीच्या पदासाठी मंडळाची विभागीय परीक्षा उत्तीर्ण/सवलत मिळालेल्या पात्र व्यक्तींमधून सेवा जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या **पदोन्नतीने** करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | (ख) ज्येष्ठ सहायक/ रोखपाल या संवर्गातील मंजूर पदांपैकी ५०% पदे मंडळातील पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या पर्यवेक्षक (उद्योग) (गट-क) या संवर्गातील, त्या पदावरील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित आणि अखंड सेवा असणाऱ्या आणि सदर पदोन्नतीच्या पदासाठी मंडळाची विभागीय परीक्षा उत्तीर्ण/सवलत मिळालेल्या पात्र व्यक्तींमधून सेवा जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या **पदोन्नतीने** करण्यात येईल. |
| | ११. | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयात "ज्येष्ठ पर्यवेक्षक(गट-क)" या पदांवरील नियुक्ती :-<br>मंडळातील पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या पर्यवेक्षक (उद्योग) (गट-क) या संवर्गातील, त्या पदावरील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित आणि अखंड सेवा असणाऱ्या आणि सदर पदोन्नतीच्या पदासाठी मंडळाची विभागीय परीक्षा उत्तीर्ण / सवलत मिळालेल्या पात्र व्यक्तींमधून सेवा जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या **पदोन्नतीने** करण्यात येईल. |
| | १२. | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयात निरीक्षक "(मधमाशापालन) (गट-क)" या पदांवरील नियुक्ती :-<br>मंडळातील पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या मधुक्षेत्रिक (गट-क) या संवर्गातील, त्या पदावरील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित आणि अखंड सेवा असणाऱ्या पात्र व्यक्तींमधून सेवा जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या **पदोन्नतीने** करण्यात येईल. |
| | १३. | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयात "कनिष्ठ सहायक तथा टंकलेखक(गट-क)" या पदांवरील नियुक्ती :-<br>१. जे उमेदवार पुढील निकषांची पूर्तता करतात अशा, त्यासाठी शासनाने नेमलेल्या निवड समितीद्वारे निश्चित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार आयोजित स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांमधून **नामनिर्देशनाद्वारे** करण्यात येईल :<br>(एक) वयोमर्यादा –<br>(क) किमान वयोमर्यादा – त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास २१ वर्षे वय पूर्ण.<br>(ख) कमाल वयोमर्यादा – त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी ३८ वर्षे वय पूर्ण केलेले आणि राखीव प्रवर्गातील असलेल्या व्यक्तींसाठी ४३ वर्षे वय पूर्ण.<br>(दोन) किमान शैक्षणिक अर्हता – कोणत्याही सांविधिक विद्यापीठामधून कोणत्याही विद्या शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण किंवा तिला समतुल्य असल्याचे घोषित केलेली अन्य कोणतीही शैक्षणिक अर्हता तसेच मराठी टंकलेखनातील प्रति मिनिट ३० शब्दांपेक्षा कमी नसेल आणि इंग्रजी टंकलेखनातील प्रति मिनिट ४० शब्दांपेक्षा कमी नसेल इतक्या वेगमर्यादेचे, शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखन प्रमाणपत्र धारण करीत असतील, अशा व्यक्तींमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.<br>२. एकूण मंजूर पदसंखेसाठी १००% पदे नामनिर्देशनाने भरण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| | | **टिप** :- मागील सेवा भरती नियमामध्ये यापूर्वी कनिष्ठ सहायक तथा टंकलेखक यातील २५ टक्के पदे शिपाई संवर्गातून पात्रतेनूसार पदोन्नतीने भरली जात होती, परंतु शिपाई संवर्गातील आधी मंजूर असलेली सर्व पदे निरसित करण्यात आल्यामुळे शिपाई संवर्गांमधील निरसित केलेली पदे कार्यरत असेपर्यंत तसेच त्या पदावर कार्यरत असलेले कर्मचारी यांची ज्येष्ठता तसेच शैक्षणिक पात्रता पूर्ण करणाऱ्यांना कनिष्ठ सहायक तथा टंकलेखक या पदावर उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागच्या दि.०६ मार्च २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या नवीन आकृतिबंधात मंजूर ५२ पदांपैकी ४० टक्के पदोन्नतीची पदे शिपाई या संवर्गातून कनिष्ठ सहायक तथा टंकलेखक या पदावर पदोन्नती देण्यांत येईल. |
| | **१४.** | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयात "पर्यवेक्षक (उद्योग) (गट-क)" या पदांवरील नियुक्ती :—<br>१. जे उमेदवार पुढील निकषांची पूर्तता करतात अशा, त्यासाठी शासनाने नेमलेल्या निवड समितीद्वारे निश्चित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार आयोजित स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांमधून **नामनिर्देशनाद्वारे** करण्यात येईल :<br>(एक) वयोमर्यादा –<br>(क) किमान वयोमर्यादा – त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास २१ वर्षे वय पूर्ण.<br>(ख) कमाल वयोमर्यादा – त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी ३८ वर्षे वय पूर्ण केलेले आणि राखीव प्रवर्गातील असलेल्या व्यक्तींसाठी ४३ वर्षे वय पूर्ण.<br>(दोन) किमान शैक्षणिक अर्हता – कोणत्याही सांविधिक विद्यापीठामधून कोणत्याही विद्या शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण किंवा तिला समतुल्य असल्याचे घोषित केलेली अन्य कोणतीही शैक्षणिक अर्हता.<br>२. एकूण मंजूर पदसंखेसाठी १००% पदे नामनिर्देशनाने भरण्यात येतील.<br>**टिप** :- यापूर्वीच्या सेवाप्रवेश नियमानुसार सहायक सचिव (गट-ड) या संवर्गातील पदास सचिव (गट-क) या पदावर पदोन्नती देण्यात येत होती. सचिव (गट-क) हे पद पर्यवेक्षक (उद्योग) (गट-क) या पदास समकक्ष पद होते. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागच्या दि.०६/०३/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार जाहीर करण्यात आलेल्या नवीन आकृतिबंधान्वये सचिव (गट-क) व सहायक सचिव (गट-ड) ही पदे निरसित करण्यात आली आहेत. त्यानुसार सचिव (गट-क) व सहायक सचिव (गट-ड) या संवर्गातील पदे कार्यरत असेपर्यंत त्यापैकी जे कर्मचारी पर्यवेक्षक (उद्योग) (गट-क) या पदासाठी आवश्यक असणारी किमान शेक्षणिक अर्हता पूर्ण करीत असतील त्यांना पर्यवेक्षक (उद्योग) (गट-क) या पदावर विहित पद्धतीने सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देता येईल/ समायोजन करता येईल. |

| | | |
|---|---|---|
| | १५. | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयात "मधुक्षेत्रिक (गट-क)" या पदांवरील नियुक्ती :-<br>१. जे उमेदवार पुढील निकषांची पूर्तता करतात अशा, त्यासाठी शासनाने नेमलेल्या निवड समितीद्वारे निश्चित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार आयोजित स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांमधून **नामनिर्देशनाद्वारे** करण्यात येईल :<br>(एक) वयोमर्यादा –<br>(क) किमान वयोमर्यादा – त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास २१ वर्षे वय पूर्ण.<br>(ख) कमाल वयोमर्यादा – त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी ३८ वर्षे वय पूर्ण केलेले आणि राखीव प्रवर्गातील असलेल्या व्यक्तींसाठी ४३ वर्षे वय पूर्ण.<br>(दोन) किमान शैक्षणिक अर्हता – कोणत्याही सांविधिक विद्यापीठामधून कोणत्याही विद्या शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण किंवा कृषी वा कृषी संलग्न विद्यापीठामधून कृषि / फलोत्पादन / वन / कृषी अभियांत्रिकी शाखेतील पदवी / पदविका किंवा या पदवी / पदविकेशी समकक्ष असल्याचे घोषित केलेली तत्सम अर्हता धारण केलेल्या व्यक्तींमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.<br>२. एकूण मंजूर पदसंखेतील १००% पदे नामनिर्देशनाने भरण्यात येतील. |
| | १६. | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयात "प्रयोगशाळा सहाय्यक (मध) (गट-क)" या पदांवरील नियुक्ती :-<br>१. जे उमेदवार पुढील निकषांची पूर्तता करतात अशा, त्यासाठी शासनाने नेमलेल्या निवड समितीद्वारे निश्चित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार आयोजित स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांमधून **नामनिर्देशनाद्वारे** करण्यात येईल :<br>(एक) वयोमर्यादा –<br>(क) किमान वयोमर्यादा – त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास २१ वर्षे वय पूर्ण.<br>(ख) कमाल वयोमर्यादा – त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी ३८ वर्षे वय पूर्ण केलेले आणि राखीव प्रवर्गातील असलेल्या व्यक्तींसाठी ४३ वर्षे वय पूर्ण.<br>(दोन) किमान शैक्षणिक अर्हता – कोणत्याही सांविधिक विद्यापीठामधून कोणत्याही विद्या शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण किंवा तिला समतुल्य असल्याचे घोषित केलेली अन्य कोणतीही शैक्षणिक अर्हता धारण केलेले तसेच कोणत्याही शासनमान्य संस्थेतील प्रयोगशाळेतील कामाचा २ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य, अशा व्यक्तींमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.<br>२. एकूण मंजूर पदसंखेसाठी १००% पदे नामनिर्देशनाने भरण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| ४ | १ | **पदोन्नतीने नेमणूक करणे .**— पदोन्नतीने करावयाची कोणतीही नियुक्ती, ज्येष्ठता अधिन पात्रता या तत्वावर अर्हता प्राप्त कर्मचाऱ्यांमधून विभागीय पदोन्नती समितीद्वारे केली जाईल. गट- अ, ब, क, ड, हे पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या कर्मचाऱ्यास प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती करताना निकटतम निम्न पदावर नियमित ३ वर्षाच्या किमान सेवेची अट पदोन्नतीसाठी पूर्व अट म्हणून राहील, अशी तरतूद करण्यात आली आहे. तसेच नामनिर्देशनाद्वारे सदर पदावर नियुक्त करण्यात येणाऱ्या उमेदवारांसाठी जी शैक्षणिक अर्हता नमूद करण्यात येईल, तीच शैक्षणिक अर्हता पदोन्नतीने नियुक्तीसाठी नमूद करण्यात येईल. तसेच पदोन्नतीने नेमणुकीबाबत वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णय / परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येईल.<br>**टीप .**— हे सेवाप्रवेश नियम प्रसिद्ध होण्याच्या दिनांकापूर्वी कनिष्ठ पद धारण करीत असलेल्या कर्मचाऱ्याला वरिष्ठ पदावर पदोन्नती देताना, असा कर्मचारी जर मागील सेवाप्रवेश नियमात नमूद वरिष्ठ पदाची शैक्षणिक अर्हता धारण करीत असेल व या सेवाप्रवेश नियमातील अन्य पदोन्नतीसाठीच्या इतर अटींची पूर्तता करीत असेल तर त्याचा या नियमांच्या प्रसिद्धीपासून तीन वर्षापर्यंत सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नतीसाठी विचार करता येईल. |
| ५ | | **नामनिर्देशन/सरळसेवेद्वारे नेमणुकीकरिता कार्यपद्धती.**—गट-अ, गट-ब तसेच गट-क ची पदे भरण्यासाठी शासन मान्यतेने निवड समिती गठित करण्यात येईल. तसेच शासन पदभरतीबाबत जो निर्देश देईल त्याप्रमाणे सेवा भरती करण्यात येईल. |
| ६ | | **विभागीय परीक्षा .**— मंडळाकडून त्याच्या अधिपत्याखालील संबंधित पदासाठी विभागीय परीक्षेचे नियम तयार करण्यात येतील. विभागीय परीक्षा नियमांतील तरतुदी विचारात घेवुन मंडळाने विहित केलेली आवश्यक ती विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. कर्मचारी संबधित विभागीय परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण न झाल्यास त्याला कायम करण्यात येणार नाही किंवा त्याच्या पदाच्या वेतनमानातील पुढील वेतनवाढ त्याला देण्यात येणार नाही अशा रितीने रोखून ठेवलेली वेतनवाढ ही, तो परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून किंवा त्याला परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून सवलत देण्यात आल्याच्या दिनांकापासून त्याला देय असेल आणि कोणतीही वेतनवाढ रोखून न धरण्याचे समजून पुढील सर्व वेतनवाढी देण्यात येतील. मात्र गतकालीन थकबाकी अनुज्ञेय नसेल. |
| ७ | | **परिविक्षाधीन कालावधी.–गट-अ व गट-ब** या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या व्यक्ती दोन वर्षाच्या कालावधीकरिता परिविक्षाधीन राहील. परिविक्षाकालावधी हा नियुक्ति प्राधिकाऱ्यांच्या अधिकाराने कमाल एक वर्षापर्यत वाढविता येईल. सदर परिविक्षा कालावधीत विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे तसेच शासनाच्या परिविक्षा धोरणानुसार हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. तथापि परिविक्षा कालावधीत विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास किंवा विहित प्रशिक्षण पूर्ण न केल्यास किंवा शासनाच्या परिविक्षाधोरणानुसार हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | **परिवीक्षाधीन कालावधी.—गट-क** या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीकरिता परिवीक्षाधीन राहील. सदर दोन वर्षांच्या कालावधीत विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे तसेच शासनाच्या धोरणानुसार हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. तथापि सदर कालावधीत विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास किंवा विहित कालावधीत प्रशिक्षण पूर्ण न केल्यास किंवा शासनाच्या धोरणानुसार हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास, विभागीय परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत, विहित प्रशिक्षण पूर्ण करेपर्यंत त्यांची वेतनवाढ रोखण्यात येईल अथवा सेवा समाप्त करण्यात येईल. |
| ८ | | **अनुकंपा नियुक्ती** .—गट-अ, गट-ब, गट-क, गट-ड या पदावर अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय असल्यामुळे संबधित पदाच्या सेवा प्रवेश नियमात अनुकंपा नियुक्ती संदर्भात शासनाच्या प्रचलित धोरणानुसार योग्य ती कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येईल. |
| ९ | १ | **संगणक अर्हता प्रमाणपत्राबाबतची तरतूद** .—नियम ३ येथील पदावर पदोन्नतीने नियुक्त होणा-या व्यक्तीने, पदोन्नतीपूर्वी संगणक अर्हता प्रमाणपत्रा संदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण करणे अथवा सामान्य प्रशासन विभाग, माहिती व तंत्रज्ञान यांनी वेळोवेळी शासन आदेशाद्वारे नमूद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी शासन आदेशानुसार निश्चित केलेल्या वयोमर्यादेनुसार संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यापासुन सवलत मिळविलेली असणे आवश्यक राहील. अन्यथा नियम ३ येथील पदावर पदोन्नती अनुज्ञेय ठरणार नाही. |
| | २ | नियम ३ येथील पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणा-या व्यक्तीने, संगणक अर्हता प्रमाणपत्र संदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार, नियुक्तीपूर्वी संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण केलेले नसल्यास याबाबत नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत सदर प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित मुदतीत प्रमाणपत्र धारण न केल्यास सदर संगणक प्रमाणपत्र धारण करेपर्यत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही. |
| १० | १ | **हिंदी व मराठी भाषा परीक्षेबाबतची तरतूद :-** नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, पदोन्नतीपूर्वी हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसंदर्भात महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेली असणे अथवा उत्तीर्ण होण्यापासून सवलत मिळविलेली असणे आवश्यक राहील. अन्यथा नियम ३ येथील पदावर पदोन्नती अनुज्ञेय ठरणार नाही. |
| | २ | नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणा-या व्यक्तीने, हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसंदर्भात महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण केलेली नसेल अथवा उत्तीर्ण होण्यापासून सवलत मिळविलेली नसेल तर, नियुक्तीनंतर संबंधित नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित मुदतीत हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| ११ | | **लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राबाबतची तरतूद.**— नियम ३ येथील पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणा-या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील तरतुदीनुसार व त्याबाबत वेळोवेळी करण्यात येणाऱ्या नियमानुसार, नियुक्तीच्या वेळी लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ या नियमात नमूद केल्यानुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करण्याच्या दिनांकास दोन अपत्यांपेक्षा जास्त असणारी व्यक्ती शासकीय सेवेत नियुक्ती मिळण्यास अपात्र असेल. शासकीय सेवेत नियुक्ती मिळाल्यानंतर एखाद्या व्यक्तीस नियुक्तीच्या वेळेस अथवा त्यानंतर दोन पेक्षा जास्त अपत्ये असल्याचे सिद्ध झाल्यास शासन सेवेतील सदर पदावर कार्यरत राहण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल. तसेच या संदर्भात वेळोवेळी निर्गमित होणारे शासन आदेश लागू राहतील. |
| १२ | | **बदली बाबतची तरतूद.**—नियम ३ येथील पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीची सेवा ज्येष्ठता यादी ही महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या मुख्यालयी ठेवण्यात येईल. त्यामुळे सदर व्यक्ती ही महाराष्ट्रात मंडळाच्या नियंत्रणाखालील कार्यरत कोणत्याही कार्यालयात बदलीसाठी पात्र राहील. |
| १३ | | **मंडळाच्या सेवेतील पदावर आरक्षण.**—मंडळाच्या सेवेतील पदांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आरक्षण लागू असेल. यामध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षण (सामाजिक आरक्षण), विशेष / समांतर आरक्षण, सामाजिक व शैक्षणिक मागासप्रवर्ग, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, दिव्यांग, महिला, खेळाडू इत्यादी साठीच्या आरक्षणाचा समावेश असेल. |
| १४ | | मंडळामध्ये वेळोवेळी सेवाभरती/आरक्षण/वयोमर्यादा/परीविक्षाधीन कालावधी नियमित करणे, इत्यादी बाबत निर्देश देणारे राज्य शासनाचे नियम, अधिनियम, निर्णय व न्याय निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| १५ | | या नियमामध्ये कोणत्याही तरतुदीच्या अर्थ विवरणाबाबत शंका उद्‌भवल्यास सदर बाब शासनाकडे निर्देशित करण्यात येईल व त्याबाबतीत शासनाचा निर्णय हा अंतिम राहील. |
| १६ | | **मंडळाच्या सेवेत प्रवेश केल्यानंतर सेवाविषयक अन्य आदेश/नियम लागू होतील** .—मंडळाच्या सेवेतील नियुक्तीसाठी या नियमाद्वारे विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक आहे. सदर नियमानुसार मंडळाच्या सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, संबंधित मंडळ कर्मचाऱ्यांस, मंडळ सेवेच्या कालावधीत, महाराष्ट्र नागरी सेवा नियम तसेच सेवाविषयक बाबीसंदर्भात राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले अधिनियम/अधिसूचना/शासन निर्णय/शासन आदेशाद्वारे अन्य नियम लागू राहतील. |

दिनांक २३ मार्च २०२६.

**गीतांजली बाविस्कर** (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी.

## मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. व जि. ठाणे

### सूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल.**

क्रमांक मनपा/नर/४०९४/२०२५-२६.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ (१९७५ चा महा. ४ था) अन्वये स्थापन झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (यापुढे ज्यांचा उल्लेख "एमएमआरडीए" असा केलेला आहे.) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे याचा उल्लेख " उक्त अधिनियम" असा केलेला आहे) चे कलम ४० च्या पोट-कलम (१) अन्वये शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीबी ४३०७/१०८/प्र.क्र.२९/०७/नवि-११, दिनांक ०१ डिसेंबर २००७ अन्वये मौजे मनोरी, गोराई (बृहन्मुंबई महानगरपालिका हद्द) आणि उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोरवा (मिरा भाईंदर महानगरपालिका हद्द) या गावांसाठी सदर अधिसूचनेमध्ये उल्लेखिलेल्या क्षेत्रासाठी (यापुढे याचा उल्लेख उक्त "अधिसूचित क्षेत्र" असा केलेला आहे), मंजूर प्रादेशिक योजनेच्या प्रस्तावानुसार मनोरंजन आणि पर्यटन विकास विभागाच्या विकासासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये उक्त अधिसूचित क्षेत्राच्या विकास आराखडयास अधिसूचना क्रमांक सीएमएस/टीपीबी-४३१२/प्र.क्र.२३/२०१३/नवि-११, दिनांक १३ मे २०१३ व दिनांक ३ जून २०१६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. (यापुढे याचा उल्लेख उक्त "मंजूर विकास योजना" असा केला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचित क्षेत्र हे बृहन्मुंबई महानगरपालिका व मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ट असून संबंधित महानगरपालिका त्यांच्या मंजूर विकास योजनेप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेची अंमलबजावणी करु शकणार असल्याने एमएमआरडीए ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती कायम ठेवणेचे प्रयोजन राहत नसल्याने शासनाने, क्र.टीपीबी-४३१६/प्र.क्र.२५७/२०१६/नवि-११, दि. १६ मार्च २०१७ रोजीच्या अधिसुचनेद्वारे मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण या विशेष नियोजन प्राधिकरणाची नियुक्ती रद्द करून सदर क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून संबंधित महानगरपालिकेची नियुक्ती केली आहे ;

ज्याअर्थी, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने (यापुढे याचा उल्लेख “उक्त नियोजन प्राधिकरण” असा केला आहे), तिच्या अधिपत्याखालील मौजे उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोरवा क्षेत्राची (यापुढे याचा उल्लेख “उक्त क्षेत्र" असा केला आहे), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे याचा उल्लेख “उक्त अधिनियम" असा केला आहे), चे कलम ३८ सह कलम २३(१) अन्वयेच्या तरतुदीनुसार प्रारुप सुधारित विकास योजना, (यापुढे याचा उल्लेख "उक्त प्रारूप विकास योजना" असा केला आहे), तयार करण्याचा इरादा **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण भाग - २ मध्ये दि. १३ मार्च, २०२४ रोजी जाहीर केला आहे;

आणि ज्याअर्थी, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने उक्त अधिनियमाचे कलम २६ (१) अन्वये उक्त प्रारुप विकास योजना जनतेकडून सूचना / हरकती मागविणेकरिता उक्त प्रारूप विकास योजना, विकास योजना अहवालासह **शासन राजपत्रात** दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे;

ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेमध्ये मौजे उत्तन येथील स. क्र. २४२ पै., २८२ पै., २८३ अ पै. या जमिनीवर आरक्षण क्र. २० “कत्तलखाना" असे आरक्षण (क्षेत्रफळ ३६७३.०० चौ. मी.) प्रस्तावीत करण्यात आलेले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६ (१) अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप सुधारित विकास योजनेमध्ये सदर ठिकाणी आरक्षण क्र. ३० “कत्तलखाना” (क्षेत्रफळ ४,७००.०० चौ. मी.) असे आरक्षण कायम ठेवून प्रस्तावित करण्यात आलेले आहे;

ज्याअर्थी, मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्व जात, धर्म पंथाचे नागरिक राहत असून त्यांना कत्तलखान्याची आवश्यकता नाही. सदर आरक्षणास स्थानिक नागरिकांकडून तीव्र विरोध दर्शविण्यात आलेला असल्याने उक्त मंजूर विकास योजनेमधील मौजे उत्तन येथील स. क्र. २४२ पै., २८२ पै., २८३ अ पै. या जमिनीवरील आरक्षण क्र. २० “कत्तलखाना” (क्षेत्रफळ ३६७३.०० चौ. मी.) हे आरक्षण वगळून त्याऐवजी “म्युनिसिपल परपज " असे आरक्षण प्रस्तावित करण्यास मा. महासभेने ठराव क्र. १७ दि. १८ फेब्रुवारी २०२६ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये मान्यता दिली आहे;

आणि ज्याअर्थी, मौजे उत्तन येथील उक्त सर्व्हे क्रमांकाच्या जमिनीवरील उक्त मंजूर विकास योजनेमधील आ.क्र. २० "कत्तलखाना" हे आरक्षण वगळुन त्याऐवजी " म्युनिसिपल परपज" असा फेरबदल उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१) अन्वये प्रस्तावित करण्यात येत आहे. (यापुढे याचा उल्लेख "उक्त प्रस्तावित फेरबदल" असा केला आहे).

त्याअर्थी, "उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत" ज्या नागरिकांना हरकती किंवा सूचना द्यावयाच्या असल्यास त्यांनी हरकती / सूचना लेखी स्वरुपात सदरची अधिसूचना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या मुदतीपर्यंत सादर कराव्यात, म्हणजे सदर फेरबदलाच्या प्रस्तावास अंतिम स्वरुप देण्यापूर्वी उक्त सूचना / हरकतींचा विचार करता येऊ शकेल.

प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा जनतेच्या अवलोकनासाठी व माहितीसाठी, महानगरपालिका, मुख्य कार्यालयात व नगररचना विभाग, स्वामी विवेकानंद भवन, कनाकिया, मिरारोड (पूर्व), ता.जि.ठाणे ४०१ १०७ या ठिकाणी कार्यालयीन वेळेत ठेवण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर,
दिनांक २३ मार्च २०२६.

**राधाबिनोद अ. शर्मा,** (भा.प्र.से.),
आयुक्त,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

## MIRA-BHAYANDAR MUNICIPAL CORPORATION

Late Indira Gandhi Bhawan, Chhatrapati Shivaji Maharaj Marg,

Bhayandar (W), Tq. & Dist. Thane

### Notice

UNDER SECTION 37 OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

क्रमांक मनपा/नर/४०९४/२०२५-२६.—Whereas, the Government of Maharashtra has appointed the Mumbai Metropolitan Region Development Authority (hereinafter referred to as its acronym "MMRDA") established under the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974(Mah. IV of 1975) to be the Special Planning Authority by the State Government in Urban Development Department's Notification No.TPB. 4307/108/CR- 29/07/UD-11, dated 1st December 2007 promulgated in exercise of its powers conferred by sub-section (*1*) of Section 40 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966(hereinafter referred to as "the said Act") for the area of villages Manori & Gorai (Municipal Corporation of Greater Mumbai) and Uttan, Pali, Chowk, Tarodi, Dongari, Morva (Mira-Bhayander Municipal Corporation) notified in the schedule of the said Notification (hereinafter referred to as "Notified Area"), to be developed as Recreation and Tourism Development Zone as per proposal of Sanctioned Regional Plan;

And whereas, under sub-section (*1*) of Section 31 of the said Act, the Government of Maharashtra by its Notification No. TPB-4312/323/CR-23/2013/UD-11, dated the 13th May 2013 and dated the 3rd June 2016 has sanctioned the Development Plan of Notified Area (hereinafter referred to as "the said Sanctioned Development Plan") submitted by the MMRDA;

And whereas, as the Notified Area falls in the limit of Municipal Corporation of Greater Mumbai and Municipal Corporation of Mira-Bhayandar, (hereinafter referred to as the "said planning authority") and the concerned Municipal Corporations are implementing their sanctioned Development Plan as a Planning Authority, therefore to continue the appointment of MMRDA as a Special Planning Authority for implementation of the said Plan is no more required, the concerned Municipal Corporations shall implement the said plan along with their sanctioned Development Plans. Therefore, the Government Cancelled the appointment of MMRDA as special Planning Authority *vide* notification No. TPB-4316/P.No.257/2016/UD-11, dated 16th March 2017 for the said notified area, and the said area merge it, in the area of respective jurisdiction of the said Concerned Planning Authority;

And whereas, the Mira-Bhayandar Municipal Corporation (hereinafter referred to as the "said planning authority") had declared its intention to Revision of Draft Development Plan of Villages- Uttan, Pali, Chowk, Tarodi, Dongri & Morva included in Mira-Bhayandar Municipal Corporation, (hereinafter referred to as the "said Draft Development Plan") for the area under its jurisdiction, (hereinafter referred to as the said "area") as per the provision of section 38 read with section 23(1) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966. (hereinafter referred to as the "said Act") and notice to that effect is published in *Maharashtra Government Gazette* extra-ordinary Part II on 13th March 2024 ;

And whereas, the Mira-Bhayandar Municipal Corporation has published the said draft development plan, along with the development plan report in the *Government Gazette* on 24th September 2025 for inviting suggestions/objections from the public under section 26(1) of the said Act ;

Whereas, in the said Sanctioned Development Plan, Reservation bearing No. 20 "Slaughterhouse" admeasuring 3,673.00 sq. m. has been proposed on land bearing Survey Nos. 242 (pt.), 282 (pt.), and 283A (pt.) situated at Mouje Uttan;

And whereas, in the Draft Revised Development Plan published under Section 26(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, the said reservation has been continued and proposed as Reservation No. 30 "Slaughterhouse" with an area of 4,700.00 sq. m.;

And whereas, the Mira-Bhayandar Municipal Corporation area comprises citizens of all castes, creeds, and religions, and there is no requirement for a slaughterhouse at the said location, and strong objections have been raised by the local residents against the said reservation. Therefore, the General Body, Mira-Bhayandar Municipal Corporation *vide* Resolution No. 17, dated 18th February 2026, has Passed to carry out modification under Section 37(1) of the said act, to delete Reservation No. 20 "Slaughterhouse" admeasuring 3,673.00 sq. m. on land bearing Survey Nos. 242 (pt.), 282 (pt.), and 283A (pt.) situated at Mouje Uttan of the said sanctioned Development Plan, and the same is to be redesigned as "Municipal Purpose";

And whereas, the modification has been proposed to delete the said Reservation No. 20 "Slaughterhouse" and the same is to be redesigned as "Municipal Purpose" in the said land is hereby proposed under Section 37(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said proposed modification");

And accordingly, the citizens who have objections or suggestions regarding the above-mentioned "proposed modification" should submit their objections/suggestions in writing within 30 days from the date of publication of the said notice in the *Government Gazette,* so that the said suggestions/ objections can be considered before finalizing the proposal for the said modification.

The plan showing the proposed modification is available for inspection by the public during office hours at the office of the Municipal Corporation and at the Town Planning Department, Swami Vivekanand Bhavan, Kanakia, Mira Road (East), Taluka and District Thane 401 107.

Mira-Bhayandar,
dated 23rd March 2026.

RADHABINOD A. SHARMA, (I.A.S.),
Commissioner,
Mira-Bhayandar Municipal Corporation.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.